२९२९



# तीन कलंदर बड़े बिलंदर

वृंदा लिमये

BVBK-0402929

दा. क्र. २९२९ नों. दि. १५।३।९४
वि. बा.वा.

वाचनालय
बा.वा.
२९२९
१५।३।९४



# तीन कलंदर बडे बिलंदर





वृंदा लिमये

BVBK-0402929

मुखपृष्ठ, रेखाटन, मांडणी :
साईनाथ रावराणे

अक्षर प्रकाशन

श्रीराम बुक डेपो
नौपाडा, ठाणे, १९९६
फोन नं. ५४२ १७ ४५

**प्रथम आवृत्ती**
जानेवारी १९९४
अक्षर प्रकाशन ४

© **वृंदा लिमये**
आशीष २५३,
सायन रोड,
मुंबई - २२.

**मुखपृष्ठ, रेखाटने, मांडणी**
साईनाथ रावराणे

**अक्षर जुळणी**
अक्षर कम्युनिकेशन्स

**मुद्रक**
मुद्रक ए-२, २७२, शहा ॲण्ड नाहर
इंडस्ट्रियल इस्टेट,
लोअर परेल,
मुंबई - ४०० ०१३.

**प्रकाशक**
अक्षर प्रकाशन,
७-८ पांडुरंग बिल्डिंग,
लेडी जमशेदजी रोड,
माहीम, मुंबई-१६.

**मूल्य - २५ रुपये**

**तीन कलंदर बडे बिलंदर**

चि. वेद आणि चि. राधिका

यांच्यासाठी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
प्र. क्र. २९२९ नों. दि. ३५/३/९४
वि. बा.वा. क्र.

# तीन कलंदर बडे बिलंदर



तीन कलंदर
बडे बिलंदर
बोटीतून त्यांनी
सोडले बंदर

पार केले
सात समिंदर
दऱ्याखोरी
गिरीकंदर

परतताना
तुफान भयंकर
पण त्यांना
पावला शंकर

नाना चिजा
घेऊन सुंदर
सुखरूप त्यांनी
गाठले बंदर

तीन कलंदर
बडे बिलंदर
त्यांचे बेटे
नशीब शिकंदर

## वेंधळेकाका

वेंधळेकाका एकदा
मित्राच्या लग्नाला गेले
एक आपली एक दुसरी
चप्पल घालून आले

वेंधळेकाका पोरांसाठी
पेरू कापू लागले
पेरूऐवजी स्वत:चेच
बोट कापून घेतले

वेंधळेकाकांनी कचेरीच्या
साऱ्या कुलपांच्या किल्ल्या
कशा कुठे हरवल्या आणि
साहेबांच्या शिव्या खाल्ल्या

वेंधळेकाकांचा वर्णावा किती
वेंधळेपणा बेसुमार
निस्तरताना बिचारी
बायको होते बेजार





## भटो अहो भटो

''भटो अहो भटो चाललात कुठे?'
''गावामधे रस्त्यांचे जिथे आहेत तिठे''

''कशाला सोवळे नि शेंडीस गाठ?''
''सत्यनारायण सांगणाराय् पूजापाठ''

''मेहूण का आज? आहे ब्बुवा थाट!''
''यजमानांच्या पंक्तीला आज आहे पाट''

''बसणार का मग नस्त्या उठाठेवी करत?''
''हातावर पडली दक्षिणा की निघणार परत!''



## लांबटांगे

लांबटांगे आहेत उंच
जसा दिव्याचा खांब
शरीरयष्टी भक्कम त्यांची–
जशी लोखंडी कांब

स्वभावाने भारी गरीब
अगदी भोळे सांब
पोरांसाठी खिशात नेहमी
चिंचा बोरे जांब

लांबटांगे आहेत उंच
जसा दिव्याचा खांब
नावाप्रमाणेच चालतात कसे
टांगा टाकीत लांब

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
प्र. क्र. २९२१ ... नों. दि. १५/३/९४
वि. बा.वा. ... क्र. ............

## अडमडे आचारी

यजमानांनी भोजनाला
पाहुणे बोलावले बारा
अडमडे आचाऱ्याने
स्वैपाक केला सारा


आमटीमधे मसाला कमी
भाजी झाली तिखट
शिकरणीत टाकली त्याने
केळी सालासकट

भात राहिला कच्चा
डाळ नाही शिजली
पापड आणि कुरडई
पाणी सांडून भिजली

रस्सा कसा बेचव
चटणी झाली खारट
रायते अगदी अळणी
दही लागले आंबट

एकाचे तोंड वाकडे
ठसकला दुसरा कोणी
तिखट खाऊन तिसऱ्याच्या
डोळ्यात आले पाणी

अडमडे आचाऱ्याने
स्वैपाक केला सारा
यजमानांच्या बेताचे
पुरते वाजले बारा



## थापाडेकाका

दरवेळी थापाडेकाका
चॉकलेट देणार मारतात थापा
पुढच्या वेळी नक्की आणणार
आत्ता मात्र घेतात पापा





## खुशालशेठ

म्हणाले एकदा
खुशालशेठ·
''घेऊन एक
जंबो जेट
मंगळावरती
जाईन थेट
किराणामालाची
उघडीन पेठ''

## तिरशिंगराव

तिरशिंगराव घरात आले की
मुलांची उडते तिरपीट
सांगता येत नाही. कुणाला कशावरून
करतील एकदम मारपीट

तिरशिंगरावांची बायको करते
स्वैपाकाची आटाआट
मनासारखी चव नसेल तर ते
उडवून देतात ताट

तिरशिंगरावांचे शेजारी त्यांना
टाळतात शक्य तर
नेम नाही कधी येतील ते
हमरीतुमरीवर

तिरशिंगरावांच्या कचेरीत सारे
त्यांना आहेत टरकून
साहेबांसकट सगळे, जरी ते
आहेत साधे कारकून

तिरशिंगरावांचे मित्र म्हणतात
''अहो तिरशिंगराव
पुरे झाला तिरशिंगपणा
जरा माणसात या ना राव''



## आई गाडी चालवते तेव्हा

आई ग जेव्हा तू
चालवायला निघतेस गाडी
अंगणामधल्या काही कुंड्यांची
नेहमीच पाडापाडी

उजवा हात दाखवतेस नि
डावीकडे वळवतेस गाडी
'बाहेर'मधून 'आत' 'आत'मधून 'बाहेर
गमतीदार तुझ्या खोडी

आई ग जेव्हा तू
चालवत असतेस गाडी
बाबांना का ग वाटते काळजी
आणि भीतीसुद्धा थोडी?



## बाबा स्वैपाक करतात तेव्हा

आई पडली आजारी
तिची झाली दमछाक
बाबा म्हणाले शूरपणाने
''मीच करणार स्वैपाक...

नको कुणाची मदत मला
नको कुणाची लुडबूड''
स्वैपाकघरात सुरू झाली
बाबांची मग खुडबूड

किती वेळ चालला होता
बाबांचा मग स्वैपाक
कडकडून लागली भूक शेवटी
बाबांनी मारली हाक

केवढातरी पसारा होता
सगळीकडे आत
कसले कसले वाससुद्धा
शिरले एकदम नाकात

भात भाजी आमटीचा
एकेकच घास गिळून
माहीत नाही कशी माझी
भूकच गेली पळून




## चेंगटमावशी

चेंगटमावशी भरते पाणी
रोज एक माठ
तेवढ्या वेळात भरतो हौद
तुडुंब काठोकाठ

चेंगटमावशी धुते धुणी
घेऊन साबणबार
तेवढ्यात तिच्या शेजारणीचे
कपडे वाळून तयार

चेंगटमावशी मीठ चटणी
वाढायला घेऊन येते
तेवढ्यात एक मोठी पंगत
भरपेट जेवून उठते

चेंगटमावशी अशी कशी
भलतीच बाबा चेंगट
सदा न् कदा तिच्यामागे
कामाचे लागले झेंगट



## ठणठणपाळ

ठणठणपाळ ठणठणपाळ
दुष्टांचा हा कर्दनकाळ
इकडे तिकडे सगळीकडे
संचार याचा सर्वकाळ

वेष बावळा दिसण्यात भोळा
मिशा कशा फिस्कारलेल्या
चांभारचौकशा चोहीकडे
डोळ्यात भावल्या विस्फारलेल्या

कुणाची केव्हा उडवील टोपी
कुणाच्या ओढील मिशा
कुणाला कधी लावील शेंडी
खोड्या सदोदित अशा

भटक भटक असतो भटकत
याला न कसली अटक
बातम्या देतो चटक मटक
ठकासमोर हा महाठक





## विक्षिप्तराव

विक्षिप्तरावांचा वेष
हॅट टाय जाकिट नि गंगाजमनी लुंगी
विक्षिप्तरावांचा छंद
पिंपळपारावर वाजवणे गमतीने गाजरपुंगी

विक्षिप्तरावांची आवड
तळलेले मासे बासुंदीत बुडवून खाणे
विक्षिप्तरावांचा व्यायाम
खाली डोके वर पाय, हातावरती चालणे

विक्षिप्तराव झोपतात
पांघरूणात डोके नि उशीवर ठेवून पाय
मी म्हणतो त्यांना
स्वप्नेसुद्धा सदोदित विक्षिप्तच पडतात की काय?



## माळीबुवा

''माळीबुवा गवत कापा
करा बाग-सफाई''
माळीबुवांना यातले काही
ऐकू येत नाही!

''माळीबुवा प्रसादाला
आज थांबा इथेच''
माळीबुवांना हे मात्र
ऐकू येते लगेच!

''माळीबुवा रोपे लावा
करा नवी खोदाई''
माळीबुवांना यातले काही
ऐकू येत नाही!

''माळीबुवा पोस्त घ्या
फटाके न्या इथलेच''
माळीबुवांना हे मात्र
ऐकू येते लगेच!



# जिप्सी

एक आहे जिप्सी
प्रवासी त्याचा वेष
जगभर असतो भटकत
पाहात नाना देश

देशोदेशी फिरून त्याने
गोळा केली नाणी
कित्ती कित्ती भाषांमधली
येतात त्याला गाणी

रंगीबेरंगी जमवलेत
त्याने पुष्कळ दगड
त्याच्याजवळ अद्‌भुत चिजा
आहेत अगदी रगड

तारे वारे दोस्त त्याचे
मैत्रिणी दिशा दाही
समुद्र त्याचे बाबा आणि
पृथ्वी त्याची आई

नद्या त्याच्या बहिणी
आणि डोंगर त्याचे भाऊ
मुलांसाठी त्याच्याजवळ
छान छान गोष्टींचा खाऊ



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्र. २०२० ... नों. दि १५/३/८४
वि. बा.बा. ... क्र.

## चक्रम

कोणे एके काळी होता
माणूस एक चक्रम
मनामधे आले त्याच्या
करावा एक विक्रम

खाली डोके वर पाय
सुरू केला सराव
हातावरती देऊन भार
पालथा घातला गाव

पेडगावपासून वेडगावपर्यंत
गाठला लांबचा पल्ला
चकित होऊन लोकांनी दिला
त्याला चांदीचा बिल्ला

स्वतःवरतीच होऊन खूष
ऐटीत म्हणाला चक्रम
''पहा बरे जगावेगळा
केला ना मी विक्रम?''



# रडतराव

कसेबसे घोड्यावरती
बसले रडतराव
खरे तर इकडून तिकडे
जेमतेम त्यांची धाव

मित्राने लावली पैज एकदा
''शेलापागोटे भारी
देईन तुला जर गावाला
मारशील एक फेरी''

शेलापागोटे भारी त्याची
सुटली त्यांना हाव
कसेबसे घोड्यावरती
बसले रडतराव

घोडे होते नाठाळ पक्के
त्याने झाडली दुगाणी
रडतरावांची स्वारी बापडी
सपशेल पडली उताणी



## अडेलतट्टू

छोटू चांगला गोल गट्टू
स्वभावाने अडेलतट्टू

पाहुणेकाकांनी मारली हाक
काम सांगतील, वाटला धाक

नंबर एकचा कामचुकार
मागल्या दाराने छोटू पसार

जमाडी गंमत ओळखा पाहू
पाहुणेकाकांनी वाटला खाऊ

सगळ्यांनी केला चट्टामट्टा
छोटूचा नाही ठेवला वाटा

हे कळल्यावर अडेलतट्टू
छोटू झाला मनात खट्टू




# शिंपीदादा

हातात कात्री, समोर कापड
नाकावरती चाळशी
कानामागे पेणसल लाल
मुलखाचा हा आळशी

कळत नाही कशात किती
कापड खातो कसा
बोलबोलता शिंपीदादा
सफाईने कापतो खिसा

बोलणे याचे अघळपघळ
कपडे स्वतःचे ढगळ
आमचे वेळेवर देत नाही
सदा टंगळमंगळ

वेष बावळा परी अंतरी
आहेत नाना कळा
बोलबोलता शिंपीदादा
सफाईने कापतो गळा




## खाऊआजी

खाऊआजीच्या बटव्यामधे
गमती किती तरी
मुलांसाठी नेहमीच त्यात
खाऊ नानापरी

खाऊआजी सांगते नेहमी
गोष्टी किती छान
भान विसरून ऐकतात मुले
टवकारून आपले कान

खाऊआजीचं इवलं टिवलं
घर जितकं छोटं
तितकंच आहे बरं का तिचं
मन फार मोठं



## श्रीयुत भडक

नावाप्रमाणेच भडक डोक्याचे
आहेत श्रीयुत भडक
नावाप्रमाणेच कपडे त्यांचे
असतात भडक तडक

एकदा खूप भडकले
रस्त्यावर गेले तडक
तरातरा आपल्या रागात
सायकलला दिली धडक

नावाप्रमाणेच भडक डोक्याचे
असे श्रीयुत भडक
नावाप्रमाणेच कपडे त्यांचे
स्वारी भलतीच कडक




## वेडगावचे शहाणे

वेडगावच्या तीन शहाण्यांनी
एकदा वाचली गीता
गाढवांचा गोंधळ
त्यापेक्षा बरा होता

वेडगावच्या तीन शहाण्यांनी
एकदा देऊन टाकल्या
चोरांच्या हातामधे
तिजोरीच्या किल्ल्या

वेडगावच्या तीन शहाण्यांनी
केले मृत्यूपत्र
हलवायाच्या घरावर
ठेवले तुळशीपत्र

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २९२९ नों. दि. १५/३/९४
वि. बा.वा. क्र.
BVBK-0402929



## या संचातली इतर पुस्तके

**चिंकू टिंकू**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रूपये

**अटक मटक**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रूपये

**बेटावरले बहाद्दर**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रूपये

**जंगल जत्रा**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रूपये

